# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.संकीर्ण-२०२३/(२७/२३)/पुणे विभाग/६४६ दि.२७-०२-२०२३

प्रति,
प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
पुणे / अहमदनगर / नाशिक.

विषय:- अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अत्यावश्यक असलेली सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांची माहिती सादर करणेबाबत...

संदर्भ:- मा.संचलनालयाकडील क्र.उशिसं/पदभ/११२१/प्र.क्र.१०/मवि-१/२०२३/२०५६, दि.२७-०२-२०२३.

उपरोक्त विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अत्यावश्यक असलेली सरळसेवेच्या कोटयातील रिक्त पदांची माहिती सोबत जोडलेल्या **विवरणपत्र-अ** मध्ये आज दि.२७-०२-२०२३ रोजी साय.०४:३० वा. पर्यंत DVBW-TTSurekh, Font Size १६ MS-Excel मध्ये तसेच स्वाक्षरीची प्रत PDF स्वरुपात या कार्यालयाकडील jdhepune@gmail.com वर निश्चितपणे सादर करण्यात यावी.

सोबतच्या विवरणपत्रामध्ये माहिती सादर करताना खालील सूचनांचे पालन करण्यात यावे:-

(१) अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती संदर्भात प्रमाण संहिता नियम, १९८४ नुसार कनिष्ठ लिपीक, ग्रंथालय लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक या वर्ग-३ संवर्गातील पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरण्याबाबतची तरतूद विषद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सरळसेवा व पदोन्नतीकरीता प्रमाणित केलेली बिंदूनामावलीमध्ये विहीत केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार सरळसेवा व पदोन्नतीसाठीची पदसंख्या नमूद करण्यात यावी.

(२) सहाय्यक ग्रंथपाल पदाच्या बाबतीत प्रमाणित करण्यात आलेली बिंदूनामावली ही सरळसेवाबाबतची असेल तरच ती पदे सरळसेवा मध्ये दर्शविण्यता यावीत.

(३) ज्या संस्थेची एकापेक्षा अधिक महाविद्यालये आहेत, त्यांचेबाबत देखील बिंदूनामावलीनुसार सरळसेवा व पदोन्नतीच्या कोटयातील पदांचे विवरणपत्रामध्ये महाविद्यालयनिहाय माहिती सादर करावयाची आहे.

(४) रिक्त / भरलेली पदांची माहिती ही दि.०१-१०-२०१७ च्या कार्यभारानुसार देण्यात यावी.

(५) महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी वरील सर्व माहितीबाबत स्वत: खात्री करावी.

**(डॉ.किरणकुमार बोंदर)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.

सोबत:- वरीलप्रमाणे.

(क्र.संकीर्ण-२०२३/(२७/२३)/पुणे विभाग दि.२७-०२-२०२३)

**विवरणपत्र-अ**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | महाविद्यालयाचे नाव | पदनाम | मंजूर पदे (दि.०१-१०-२०१७ नुसार) | | | भरलेली पदे (दि.०१-१०-२०१७ रोजीच्या स्थितीनुसार) | | | रिक्त पदे | | | पद कधीपासून रिक्त आहे (दिनांक नमूद करणे) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सरळसेवा | पदोन्नती | एकूण | सरळसेवा (यामध्ये पदोन्नतीने भरलेल्या पदांचा समावेश करण्यात येऊ नये) | पदोन्नती | एकूण | सरळसेवा (यामध्ये पदोन्नतीने भरलेल्या पदांचा समावेश करण्यात येऊ नये) | पदोन्नती | एकूण | सरळसेवा | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १. | | | सहाय्यक ग्रंथपाल | | | | | | | | | | | |
| २. | | | कनिष्ठ लिपीक | | | | | | | | | | | |
| ३. | | | ग्रंथालय लिपीक | | | | | | | | | | | |
| ४. | | | प्रयोगशाळा सहाय्यक | | | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की, वरील सर्व माहिती मी तपासली असून ती बरोबर असल्याची खात्री केली आहे.

प्राचार्य